21 DEC 2025

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेत ३३ ठराव मंजूर

## इतिहासात पहिल्यांदा जास्त ठराव मंजूर झाल्याने अधिसभा सदस्यांचे शिक्षण क्षेत्रातून कौतुक

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेत पहिल्यांदाच १०५ ठराव मांडण्यात आले. यापैकी ३३ ठराव मंजूर तर ७२ ठराव नामंजूर करण्यात आले. आर्थिक वर्ष २०२४-२०२५ चे वार्षिक लेखे, ताळेबंदपत्रक व लेखापरीक्षण अहवाल त्रुटी, दुरूस्तीसह मान्य करण्यात आला. या अहवालावर अनेकांनी प्रश्न उपस्थित करीत वित्त व लेखाधिकाऱ्यांना धारेवर धरण्यात आले. प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली ही अधिसभा झाली. आतापर्यंतच्या इतिहासात पहिल्यांदाच .... ठराव मंजूर झाल्याने शिक्षण क्षेत्रातून अधिसभा सदस्यांचे कौतुक होत आहे.

वार्षिक लेखे, ताळेबंदपत्रक व लेखापरीक्षण अहवालातील त्रुटीवरून संजय



● १०५ पैकी ७२ नामंजूर : सुमारे १२ तास अधिसभा सुरू

परमणे, अमित कुलकर्णी, विष्णू खाडे, रतन कांबळे, पृथ्वीराज पाटील, मनोज गुजर, डॉ. प्रकाश कुंभार यांच्यासह अन्य सदस्यांनी प्रश्न उपस्थित करीत विद्यापीठ प्रशासनाला धारेवर धरले. तसेच अधिसभेत भगवान महावीर अध्यासनात अनेकांत दर्शन अभ्यासक्रम सुरू करण्याचा ठराव मान्य करण्यात आला आहे. अभ्यास मंडळाच्या जागा भरण्यास मान्यता, अधिविभागांसाठी एकच परीक्षा केंद्र असावे, शिक्षक मान्यता, सेवाशर्ती, कागदपत्रे स्कॅन करून कायमस्वरूपी जतन करावी. विद्यार्थी संख्या कमी असल्यास ज्यादाची तुकडी देऊ नये, प्रशासकीय सेवकांना जागेसह पूरक सुविधा द्याव्या, जननायक भगवान बिरसा मुंडा अध्यासन, विद्यापीठात हस्तक्षेप करणाऱ्या संस्था, संघटनांवर कारवाई करावी, अपघात व वैद्यकीय निधीची मर्यादा वाढवावी, यासह अन्य ठराव मंजूर करण्यात आले. अनेक ठरावांवर किमान अर्धा ते पाऊण तास चर्चा करून ते मंजूर करण्यात आले. रात्री साडेआठ वाजेपर्यंत ४३ पैकी १५ ठराव मंजूर करण्यात आले. सुमारे १२ तास अधिसभा सुरू होती. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव,

▶ पान ४ वर

### विद्यार्थ्यांना मारहाण का केली

जुबली फंडासाठी विद्यापीठात आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना सुरक्षा रक्षकांनी मारहाण का केली? असा सवाल अमित कुलकर्णी यांनी सभागृहात उपस्थित केला. यावर विशाल गायकवाड व रतन कांबळे यांनीही प्रशासनाला धारेवर धरण्याचा प्रयत्न केला. परंतू सुरक्षा रक्षकांनी मारहाण केली असेल तर दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिले. त्यानंतर अधिसभा सदस्य शांत झाले.

# शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेत ३३ ठराव मंजूर

▶ पान १ वरून : कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सांगलीचे आमदार सुधीर गाडगीळ यांची प्रमुख उपस्थिती होती.

### त्रुटी, दुरूस्तीसह ताळेबंदपत्रक, लेखा परीक्षण अहवाल मंजूर

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चे वार्षिक लेखे, ताळेबंदपत्रक, लेखा परीक्षण अहवालात सदस्यांनी अतिथीगृह, उपहारगृह याची थकबाकी यासह विविध अधिविभागांचे भाडे, जीएस पोर्टल, ई-टेंडरिंग या विषयावर मते मांडली. शेवटी कुलगुरुंनी दुरूस्तीसह अहवाल पुढे घेऊ, असे सांगितले. त्यानंतर सदस्यांनी ठराव मंजूर केला.

झालेला
१.४७
ही सुटा
शाब्दिक
र श्वेता
ज्ञानदेव
प्रस्ताव
अध्यक्ष
नी तिन्ही
र केले.
पहिलीच
तावाविना
अधिसभा

21 DEC 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अधिसभेत १०५ ठरावांवर चर्चा

## रात्री अकरापर्यंत चालली सिनेट; ३३ मान्य, ७२ अमान्य

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभेत (सिनेट) यंदा विक्रमी ११० ठराव मांडण्यात आले. रात्री अकरा वाजेपर्यंत अधिसभेत सुमारे १०५ ठरावांवर चर्चा झाली. यातील ३३ ठराव मान्य झाले, तर ७२ ठराव अमान्य करण्यात आले. प्रश्नोत्तराच्या तासात केवळ चार प्रशन झाले. मागील अधिसभा कार्यवृत्तांत दुरुस्ती कायम करण्यात आला. तसेच २०२४-२५ चे वार्षिक लेखे, ताळेबंद पत्रक व लेखा परीक्षा अहवाल त्रुटी, दुरुस्तीसह मान्य करण्यात आला.

विद्यापीठाची अधिसभा प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. याप्रसंगी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सांगलीचे आमदार सुधीर गाडगीळ प्रमुख उपस्थित होते. सुरुवातीला मागील अधिसभा कार्यवृत्तांत दुरुस्ती कायम करण्यासाठी अधिसमोर ठेवण्यात आला. यावेळी सदस्य प्रताप पाटील यांनी ९ महिन्यांनंतर सिनेट होत असल्याचे सांगितले. ॲड. अभिषेक मिठारी यांनी गेल्या सात अधिसभांमधील ठरावाची माहिती




अद्याप मिळाली नसल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. मागील अधिसभेचा कृती अहवाल, अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न, त्यांना दिली जाणारी उत्तरे यावर चर्चा झाली. पहिले तीन विषय सदस्यांनी मंजूर केले.

त्यानंतर अधिसभेत एक तास प्रश्नोतरांचा झाला. ३० पैकी केवळ ३ प्रश्नांवर चर्चा झाली. मूळ विषयापेक्षा अवांतर चर्चा आणि उपप्रश्नामुळे कोणत्याच प्रश्नावर ठोस उत्तर सदस्यांना मिळाले नसल्याचे दिसून आले. डॉ. प्रकाश कुंभार यांनी परीक्षा केंद्रावरील बैठी भरारी पथके, गेल्या तीन वर्षांतील मान्यता काढून घेतलेले परीक्षा केंद्र, परीक्षा पूर्व प्रयोगशाळांची तपासणी आदी विषय उपस्थित केले. ठरल्याप्रमाणे डॉ. रघुनाथ ढमकले हे सर्व प्रश्नांची उत्तरे देणार होते; परंतु काही तांत्रिक कारणास्तव ते उपस्थित नसल्याने प्रा. डॉ. बबन सातपुते यांनी सदस्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. यावेळी त्यांची चांगलीच दमछाक झाली.

परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सदस्यांच्या प्रश्नांची उत्तरे देत प्रा. सातपुते यांना सावरून घेतले. त्यानंतर अधिसभेत ठराव मांडण्यात आले. १२ तासांहून अधिक काळ अधिसभा सुरूच होती.

### कुलगुरूंनी नाकारले तीन स्थगन प्रस्ताव

अधिसभेत डॉ. श्रीनिवास वरेकर यांनी 'टेट-सेट' पेपर फुटी प्रकरण याबद्दल स्थगन प्रस्ताव मांडला; परंतु कुलगुरू डॉ. गोसावी यांनी या प्रश्नाचा ठराव मांडण्यासाठी आला आहे, त्यावेळी चर्चा करू, असे सांगत स्थगन प्रस्ताव नाकारला. तसेच सदस्य श्वेता परुळेकर यांनी महाराणी ताराराणी यांच्या ३५० व्या जयंतीनिमित्त त्यांचे कर्तृत्व व जीवनकार्य यावर विद्यापीठाने पुस्तक प्रकाशित करावे यासह दुसऱ्या विषयावरील स्थगन प्रस्ताव मांडला. ते दोन्हीही स्थगन प्रस्ताव सामान्य असून त्याच्यावर चर्चा करू, असे सांगत कुलगुरूंनी ते नाकारले.

### त्रुटी दुरुस्तीसह ताळेबंद पत्रक, लेखापरीक्षण अहवाल मंजूर

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चे वार्षिक लेखे, ताळेबंद पत्रक, लेखापरीक्षण अहवाल डॉ. रघुनाथ ढमकले सादर करणार होते; परंतु ते उपस्थित नसल्याने वित्त व लेखाधिकारी सुहासिनी पाटील यांनी अहवाल सादर केला. यात सदस्यांनी अतिथीगृह, उपहारगृह यांची थकबाकी यासह विविध अधिविभागांचे भाडे, जीएस पोर्टल, ई-टेंडरिंग याविषयावर मते मांडली. शेवटी कुलगुरूंनी दुरुस्तीसह अहवाल पुढे घेऊ, असे सांगितले. त्यानंतर सदस्यांनी ठराव मंजूर केला.

21 DEC 2025
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्थगन प्रस्तावाविना शिवाजी विद्यापीठाची अधिसभा

## लेखापरीक्षणचा अहवाल त्रुटीतील दुरुस्तीसह मंजूर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** गेल्या अनेक वर्षांत शिवाजी विद्यापीठातील पहिलीच अधिसभा स्थगन प्रस्तावाविना झाली. अधिसभा सदस्य डॉ. निवास वरेकर आणि श्वेता परुळेकर यांनी मांडलेले एकूण तीन स्थगन प्रस्ताव अधिसभेत प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी नाकारले. या सभेत आर्थिक वर्ष २०२४-२०२५चे वार्षिक लेखे, ताळेबंदपत्रक आणि लेखापरीक्षण अहवाल त्रुटीतील दुरुस्तीसह मंजूर करण्यात आले.

शिवाजी विद्यापीठाची अधिसभा आठ महिन्यांनी शनिवारी शाहू सभागृहात पार पडली. याप्रसंगी प्र. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते. प्रश्नोत्तराचा तास चारच प्रश्नावर संपला. दुपारी १२.४७ वाजता याला प्रारंभ झाला. या सभेत पटलावरील ३० प्रश्नांपैकी डॉ. प्रकाश कुंभार यांच्या तीन आणि डॉ. शाहीन पटेल यांच्या एका प्रश्नावर चर्चा झाली.

डॉ. रघुनाथ ढमकले उपस्थित नसल्याने ऐनवेळी बबन सातपुते यांना उत्तरे देण्यास सांगितले, परंतु भाषणबाजीमुळे डॉ. कुंभार यांनी त्यांना रोखले, त्यामुळे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी उत्तरे दिली. डॉ. डी. एन. पाटील, डॉ. मनोज गुजर, ज्ञानदेव काळे, बी. एस. सावंत, विष्णू खाडे, शाहीन पटेल, संजय परमणे, अमित कुलकर्णी, रतन कांबळे, एस. पी. हंगीरगेकर यांनी उपप्रश्न विचारले. या तीनच प्रश्नावर प्रचंड गोंधळ झाला. प्रश्नोत्तर तासातही सुटा आणि सत्ताधाऱ्यांमध्ये बाचाबाची झाली.

अधिसभा बैठकीस आमदार सुधीर गाडगीळ, पृथ्वीराज पाटील, डॉ. डी. एन. पाटील, बी. एस. सावंत, डॉ. आर. आर. कुंभार, ज्ञानदेव काळे उपस्थित होते.

यापूर्वीच्या अधिसभा बैठकींमधील ठरावांच्या अंमलबजावणी आणि ताळेबंद व लेखापरीक्षण अशा मुद्यांवरून सदस्यांनी प्रशासनास धारेवर धरले.

चर्चेत ॲड. अभिषेक मिठारी, प्रताप पाटील, विष्णू खाडे, श्रीनिवास गायकवाड, डॉ. घनशाम दीक्षित, सुजित शेडगे, डॉ. निवास वरेकर, मनोज गुजर यांनी भाग घेतला.

### तीन प्रस्ताव नाकारले

सदस्य डॉ. वरेकर यांनी सेट पेपर फुटीप्रकरणी स्थगन प्रस्ताव सादर केला. मात्र, पुढील चर्चेत ठराव येणार असल्याने अध्यक्षांनी तो नाकारला. श्वेता परूळेकर यांनी महाराणी ताराराणी यांच्या ३५० व्या जयंतीनिमित्ताने पुस्तक प्रकाशित करावे, या मागणीसाठी स्थगन प्रस्ताव मांडला. मात्र, विद्यापीठ परिभाषेत तो नसल्याने तो नाकारत विद्यापीठ स्वतंत्र त्यावर निर्णय घेईल, असे अध्यक्षांनी स्पष्ट केले. परुळेकर यांनी मांडलेला दुसरा प्रस्तावही ठरावात समाविष्ट असल्याने नाकारला.

### १०५ पैकी ३३ ठराव मंजूर, ७२ ठराव मागे

शिवाजी विद्यापीठाची अधिसभा बैठक शनिवारी रात्री उशिरापर्यंत चालली. सकाळी ११ वाजता सुरू झालेली ही बैठक रात्री उशिरा ११ वाजून ०५ मिनिटांनी संपली.१२ तास सुरू राहिलेल्या बैठकीत १०५ पैकी ३३ ठराव चर्चा होऊन मंजूर झाले तर ७२ ठराव मागे घेण्यात आले. माजी सैनिकांची रक्कम परत मिळविल्याबद्दल श्वेता परुळेकर यांनी विद्यापीठाचे अभिनंदन केले.

### महावीर अध्यासनात 'अनेकांत दर्शन'

विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाकडून 'अनेकांत दर्शन' हा ऑनलाइन आणि ऑफलाइन माध्यमातून सर्टिफिकेट कोर्स सुरू करण्याचा ॲड. अभिषेक मिठारी यांनी मांडलेला ठराव अधिसभेने मंजूर केला. एम. ए. जैनोलॉजी हा विषय काही वर्षांपूर्वी बंद झाला होता. यासाठी मनोज पाटील, ॲड. अभिजित कापसे आणि डॉ. महावीर अक्कोळे यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 1 DEC 2025

जनप्रवास

# दीक्षांत समारंभाची विद्यापीठाकडून जय्यत तयारी

## • मंडप उभारणी, पदवी प्रमाणपत्र वाटप स्टॉल उभारणीला वेग

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा दीक्षान्त समारंभ बुधवार, २४ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. भारताचे संरक्षण व अवकाश संशोधक डॉ. जी. सतीश रेड्डी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाने जय्यत तयारी सुरू केली आहे. मंडप उभारणी, पदवी प्रमाणपत्र स्टॉल उभारणीचे काम अंतिम टप्प्यात आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात १६,१५९ स्नातक प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र स्वीकारणार आहेत. या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र कोणत्या स्टॉलवर मिळणार याची माहिती एसएमएसव्दारे दिली जाणार आहे. दीक्षांत समारंभात ग्रंथ प्रदर्शन, खाऊचे स्टॉल उभारणी सुरू झाली आहे. तसेच आत्तापर्यंत ज्यांना डीलिट मिळाली त्यांचे फोटोही लावले जाणार आहेत. तसेच पदवी प्रमाणपत्र छपाईचे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच मान्यवरांचा पोषाख व उपरण्याचा कलर निश्चित केला आहे. तसेच दीक्षांत समारंभाचे काम करण्यासाठी समित्या स्थापन केल्या आहेत. व्यासपीठावर कोणाला पीएच. डी. पदवी द्यायची याची नावे अंतिम केली आहेत. तसेच ग्रंथदिंडीत कोणकोणती महाविद्यालये सहभागी होणार आहेत, ग्रंथदिंडीच्या माध्यमातून वाचनाचा संदेश कशा प्रकारे द्यायचा याचे फलक तयार केले आहेत.



**कोल्हापूर : दीक्षांत समारंभात पदवी प्रमाणपत्र वाटप करण्यासाठी विद्यापीठ परिसरात स्टॉलची उभारणी करण्याचे काम सुरू आहे.**

2 1 DEC 2025

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अक्षयला राष्ट्रपती, आर्याला कुलपती सुवर्णपदक

## परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांची माहिती

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाचा ६२ वा दीक्षान्त समारंभ बुधवार, २४ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. भारताचे संरक्षण व अवकाश संशोधक डॉ. जी. सतीश रेड्डी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी असतील. राज्यशास्त्र अधिविभागाचे विद्यार्थी अक्षय नलवडे-जहागीरदार यांना राष्ट्रपती सुवर्णपदक तर मार्च २०२५ मध्ये सर्व एम.ए. परीक्षांमधून 'मानसशास्त्र' विषयात सर्वाधिक गुण मिळाल्याबद्दल आर्या देसाई (हुपरी) यांना कुलपती सुवर्णपदक जाहीर झाले आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

डॉ. जाधव म्हणाले, यंदाच्या दीक्षान्त





समारंभात एकूण ४९,९०२ स्नातक पदवी घेणार आहेत. यामध्ये विद्यार्थिनींची संख्या २८,५१३ इतकी लक्षणीय आहे. १६,१५९ स्नातक प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी घेणार आहेत, तर ३३७४३ स्नातक पोस्टाने पदवी घेणार आहेत. दीक्षान्त समारंभ झाल्यानंतर स्नातकांना त्यांची प्रमाणपत्रे त्यांच्या नॅशनल ॲकॅडेमिक डिपॉझिटरी अकाऊंटमध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

दीक्षांत समारंभानिमित्त २३ ते २४ डिसेंबर या कालावधीत ग्रंथ महोत्सव होत आहे. २३ डिसेंबरला सकाळी ७.३० वाजता कमला महाविद्यालय येथून कुलगुरू डॉ. गोसावी यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे उद्घाटन होईल. तेथून जनता बझार, राजारामपुरी मेन रोड, आईचा पुतळा, सायबर चौक, शिवाजी विद्यापीठ गेट क्र. ६ या मार्गे दिंडीचे राजमाता जिजाऊ साहेब सभागृहातील दीक्षान्त सभा मंडपात आगमन होऊन तेथे विसर्जन करण्यात येईल.

त्यानंतर सकाळी १० वाजता कुलगुरूंच्या हस्ते विद्यापीठाच्या अनेक्स इमारत प्रांगणात ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन होईल. त्यानंतर राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात सांस्कृतिक कार्यक्रम होतील. ग्रंथमहोत्सवातील स्टॉल दोन्ही दिवशी सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत सुरू राहतील.

2 1 DEC 2025
लोकमत

# शिक्षणशास्त्र विभागाच्या कार्यशाळेचा समारोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ, शिक्षणशास्त्र अधिविभाग आणि हैदराबाद येथील महिंद्रा प्राइड क्लासरूम नांदी फाउंडेशनतर्फे 'जॉब रेडीनेस अंडर इमप्लोयबिलीटी स्किलस फॉर स्टुडंट टीचर' या विषयावर घेतलेल्या सहा दिवसीय कार्यशाळेचा शनिवारी समारोप झाला. या कार्यशाळेत विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विभाग प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे अध्यक्षस्थानी होत्या.

नांदी फाउंडेशनच्या मुस्कान चावला प्रशिक्षक होत्या. सरस्वती कांबळे, संगीता माने, ममता घोटल, संजना भालकर यांनी कार्यशाळेचे नियोजन केले यावेळी डॉ. रूपाली संकपाळ, सारिका पाटील, कादंबरी खांडेकर, डॉ. अंजली गायकवाड, श्रद्धा तांडेल, संगीता चंदनवाले, अतुल जाधव उपस्थित होते

21 DEC 2025
पुढारी

# शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या कार्यशाळेचा समारोप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ शिक्षणशास्त्र अधिविभाग व महिंद्रा प्राईड क्लासरूम नांदी फाउंडेशन, हैदराबाद यांच्या वतीने मजॉब रेडीनेस अंडर इमप्लोयबिलीटी स्किलस फॉर स्टुडंट टिचरफ या विषयावरील सहा दिवसीय कार्यशाळेचा समारोप समारंभ झाला.

अध्यक्षस्थानी शिक्षणशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ.चेतना सोनकांबळे होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, इतरांना प्रेरणा देणे, सहकार्य वृत्ती व आवश्यक संवाद कौशल्य, कार्यतत्परता असायला हवी, असे प्रतिपादन केले. कार्यशाळा समन्वयक डॉ.विद्यानंद खंडागळे यांनी प्रास्ताविक केले. मुस्कान चावला यांनी प्रशिक्षक म्हणून कार्य केले. सुहाना नायकवडी यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. रुपाली संकपाळ, सारिका पाटील, कादंबरी खांडेकर, डॉ. अंजली गायकवाड, श्रध्दा तांडेल, संगीता चंदनवाले, अतुल जाधव उपस्थित होते.

2 1 DEC 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात स्टार्टअपसाठी संवाद सत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील नवोपक्रम, नवसंशोधन व उपक्रम मंडळ, शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने नाविन्य व उद्योजकतेच्या क्षेत्रातील भागधारकांसाठी संवादात्मक सत्र संपन्न झाले.या सत्रात भारत सरकारच्या राष्ट्रीय एमएसएमई बोर्डाचे सदस्य प्रदीप पेशकर प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. या सत्रात एमएसएमई धोरणे व शासकीय सहाय्य योजना, स्टार्टअप्सच्या वाढी व विस्ताराच्या संधी, नवोपक्रम, बौद्धिक संपदा तसेच उद्योजकता परिसंस्थेचा विकास या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे देत थेट संवाद साधला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू प्रा. ज्योती जाधव उपसिथत होत्या स्वागत, संचालक प्रा. सागर डेळेकर यांनी केले. यावेळी श्रीनिवास गायकवाड, काव्यश्री नलवडे स्टार्टअप्स उद्योजक, पेटंटधारक इनक्युबेटीज उपस्थित होते.

21 DEC 2025
लोकमत

# अनिता तावडे यांना आंतरराष्ट्रीय फेलोशिप

लोकमत न्यूज नेटवर्क

**सांगरूळ :** येथील डॉ. अनिता कुंडलिक तावडे यांची चीनमधील फुझो नॅशनल युनिव्हर्सिटीमध्ये पोस्टडॉक्टोरल संशोधनासाठी निवड झाली. डॉ. तावडे यांना संशोधनातील उत्कृष्ट कामगिरीमुळे ही आंतरराष्ट्रीय संधी मिळाली आहे. चीनच्या प्रतिष्ठित विद्यापीठात फेलोशिप मिळणे, ही कोल्हापूर जिल्ह्यातील संशोधकांसाठी मोठी उपलब्धी मानली जात आहे. यामुळे स्थानिक स्तरावर शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात नव्या प्रेरणा मिळण्याची संधी आहे.



डॉ. तावडे यांचे प्राथमिक शिक्षण सांगरूळ हायस्कूल येथे झाले. त्यांनी शिवाजी विद्यापीठात एमएस्सी, पीएच.डी. (नॅनो टेक्नॉलॉजी) पूर्ण केली. त्यांचे वडील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कर्मचारी आहेत.